म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय का. वी.
922

का. वी.
922

# संत जनाबाई आणि संत सांवता माळी

BVBK-0400122

बा. वा.
नों. क्र. १२२

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. १२२ दिनांक .....
विषय किशोर क्र. ....१०९

BVBK-0400122

'आला संतांचा मेळा'

भाग ७ वा

संपादक : डॉ. म. वि. गोखले

एम्. ए., पीएच्. डी.

# संत जनाबाई

आणि

# संत सांवता माळी

लेखिका

सौ. कुमुदिनी पवार

बी. ए. (ऑनर्स)



प्रकाशिका :

सौ. निर्मला नारायण अरगडे
सौ. मालिनी माधव कुलकर्णी
अरगडे कुलकर्णी प्रकाशन,
१६/३४. लोकमान्यनगर, पुणे ३०

⊙

सर्व हक्क प्रकाशिकाधीन.

⊙

प्रथमावृत्ती ऑगस्ट १९७५.

⊙

मूल्य रु. चार.

⊙

चित्रकार : एस. के. परब

⊙

मुद्रक :
प्रभाकर सरदेसाई एम्.एस्.सी.
अक्षर मुद्रणालय, इंडस्ट्रियल इस्टेट
नागरगाव, लोणावळा

प्रकाशन क्रमांक १७७

# ऋणनिर्देश

माझ्या आईची श्रीकृष्णावरची नितांत भक्ती, श्रद्धा, प्रेम, ह्यामुळे मी भारावलो गेलो. दुर्गाबाई भागवतांचा ‘ पूर्णपुरुष ’ वाचून मी कृष्ण-प्रेमात राधेसारखा वेडा झालो. ह्या वेडाच्या भरात उतरलेले हे शब्द म्हणजे मला भेटलेली श्रीकृष्णाची रूपे नि त्यांची ही कथा.

‘ श्री ’ न लिहिता येणाऱ्या मला ‘ श्रीकृष्णाची कथा ’ सांगायला उद्युक्त करणारे माझे सर्व मित्र, सगेसोयरे, आप्तस्वकीय, सौ. ताई, प्रकाशक श्री. ल. गो. परांजपे नि पुस्तकाला आशीर्वाद देणारे श्री. रत्नाकर मतकरी, या सर्वांचा मी ऋणी आहे.

पुस्तकाची सुरुवात माझा वडीलभाऊ धीरेंद्र ह्याच्या घरात झाली नि सारं पुस्तक श्री. सुखटणकर ह्यांनी विशेष कष्ट घेऊन पुरे करून घेतले. सुखटणकर कुटुंबीयांचा मी अतिशय ऋणी आहे. असंख्य मायेचे हात फिरले म्हणूनच ना ही पहिली शब्दुली पुस्तक-रूपात दिसते....!

—वामन देशपाण्डे

॥ श्री ॥

सर्व दुःख पचवून

सर्वांसाठी देवाजवळ

सदैव आनंद मागणारे

माझे आई-वडील

**श्री. अच्युतराव विठ्ठलराव देशपाण्डे**

आणि

**सौ. रंगूबाई अच्युतराव देशपाण्डे**

यांना

सविनय सप्रेम अर्पण...

**—वामन**

# प्रास्ताविक

भगवान श्रीकृष्णाचे चरित्र अत्यंत अफाट आहे. क्षणाक्षणाला रंग बदलणारे आकाश, किंवा भरती-ओहोटीचे चमत्कार खेळणारा सागर यांच्यासारखे. रामायणाची त्यात एकसूत्रता नाही. अनेक आख्याने, अनेक प्रसंग, अनेक व्यक्तिरेखा, रौद्रभीषणापासून शांतवत्सलापर्यंत अनेक रस.

या अशा अनेकविध छटांमधूनच कृष्णाचे अवघे चरित्र उभे राहाते. किंवा एक चरित्र उभे राहाते असे तरी कसे म्हणावे? अनेक चरित्रे उभी राहातात; कारण व्यक्तिरेखाच भिन्न भिन्न वाटतात. श्रीकृष्णशिष्टाई करणारा राजकारणी कृष्ण आणि गोप सख्यांना मुरलीच्या सुरांनी मंत्रमुग्ध करणारा महान् कलावंत कृष्ण, भगवद्गीता सांगणारा तत्त्वज्ञानी कृष्ण आणि मुष्टियुद्धात मल्लांना लोळवणारा कृष्ण—हे सारे कृष्ण एकच आहेत हे कसे पटावे? मग असेच म्हणावेसे वाटते की, यांतून एक व्यक्तिरेखा किंवा एक चरित्रनायक शोधूही नये. जिथे पोकळी राहते, तिथे ती व आपल्या तेजाने व्यापून टाकणारे चिरंतन तत्त्व म्हणजे कृष्ण. मग संकटात सापडलेल्या दीनदुर्बलांसाठी आधाराची गरज निर्माण होवो अथवा युद्धाच्या कोलाहलाने बावरून गेलेल्या मनात विचारशून्यता तयार होवो, तिथे प्रगट होऊन 'दुरितांचे तिमिर' वाटणारे तत्त्व म्हणजे श्रीकृष्ण!

अशा या अनेकांगी अनेकरंगी श्रीकृष्णचरित्रांतूनही कुठली एकच एक गोष्ट सातत्याने जाणवते, तर ती म्हणजे निरासक्तीची शिकवण. कृष्ण निरनिराळ्या रूपांतून जाताना दिसतो, पण कुठेही स्थायिक होत नाही. अडकून पडत नाही. गोकुळात असताना गोपसख्यांवर प्राणापलीकडे प्रेम करणारा कृष्ण मथुरेला गेल्यानंतर पुन्हा कधीही मागे वळून पाहात नाही. पांडवांना राज्य मिळवून देण्यासाठी हिरिरीने झटणारा कृष्ण स्वत: मथुरेचे राजेपण अंगावरल्या वस्त्रासारखे लीलया झटकून टाकतो. निराशक्तीचे हे जीवनरहस्य तो भगवद्गीतेत उघड करतो, आणि अखेरीस सारे जग बाजूला ठेवून अरण्यांत एकाकीपणे देह ठेवतो. कृष्ण हे महान तत्त्व खरे, परंतु त्याची शिकवण ही तुमच्या आमच्यासारख्या सर्वसामान्यांसाठीच आहे. सुखदु:खांनी आपण इतके आतूनबाहेरून लडबडून गेलेले असतो, की माणुसकीचे मूलतत्त्व दिसेनासेच होते. थोडीशी चलबिचल होताच मनाचा तोल जातो, आणि व्यवहाराच्या चिखलात माणूस अधिकच खोल रुततो. म्हणूनच श्रीकृष्णाची शिकवण 'सुखदु:खे समीकृत्वा' राहण्याची. व्यवहार सोडून नव्हे—कारण तुम्हाआम्हांला व्यवहार सुटलेला नाहीच, पण स्वत: श्रीकृष्णही व्यवहारपटू होता. त्याने गोकुळाला आर्थिक स्थैर्य दिले. यादवांचे राज्य वसवले, कौरवांशी राजकारणात दोन हात केले, आणि युद्धनीतीचे किचकट डावपेचही तो खेळला. पण हे सारे आपले मानूनही आपण स्वत: त्यांतून दशांगुळे बाकी उरणे त्याला साधले; तुम्हाआम्हांला हाच योग साधायला कृष्णचरित्र सांगते. सुखदु:खाच्या रंगाची होळी जरूर खेळायला हवी; पण आतला माणूस उरायला हवा तो स्वच्छ, निर्मळ, रंगहीन, पाण्यासारखा, प्रकाशासारखा.

कृष्णचरित्राचे हे तत्त्व आज जगाला उमजले तर क्षुद्र स्वार्थाच्या जबड्यात अडकलेला माणूस सहजपणे मुक्त होईल. जुन्या पिढ्यांच्या आचरणात ही तत्त्वे सहजपणे येत, कारण स्वार्थ साधण्याची धडपड

तेव्हा आत्ताच्याइतकी नसावी. आज लौकिक स्वार्थ आणि संपन्नता साधता साधता आपण स्वतःला हरवत चाललो आहोत का? इतर प्रगत राष्ट्रांकडे पाहिले तरी भविष्यातला हा धोका सहज दिसून येतो. पराकोटीच्या आर्थिक संपन्नतेपायी आजच्या अमेरिकन तरुण पिढीला वैफल्याची भीषण पोकळी जाणवायला लागली आहे, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही पोकळी बुजवण्यासाठी या तरुणांना पुन्हा कृष्ण-नामाचाच जप करावासा वाटू लागला आहे. कृष्णमंदिरे बांधावीशी वाटू लागली आहेत. आजही हे चिरंतन तत्त्व ही वैफल्याची पोकळी भरून काढू लागले आहे.

तेव्हा आज आवश्यकता आहे ती श्रीकृष्णाचा संदेश सर्वसामान्य माणसापर्यंत पोचण्याची, विशेषतः तरुण वाचकवर्गापर्यंत पोचून त्यांना विचारप्रवण करण्याची. इंग्रजी माध्यमामुळे ज्या मुलांना भारतीय संस्कृतीची माहिती कमी आहे अशांसाठी आणि एकंदरीतच मुलांच्या समजुतीत भर टाकण्यासाठी आज 'श्रीकृष्णचरित्र' सारखी पुस्तके त्यांच्या हातात देण्याची गरज फार मोठी आहे. नुसते श्रीकृष्णचरित्रच नव्हे, तर रामायण, महाभारतही. ज्या ज्या ग्रंथांनी आपली संस्कृती घडवली आहे, त्या त्या ग्रंथांच्या शिकवणीचा वारसा सुबोध पुस्तका-द्वारा मुलांपर्यंत पोचणे ही आजच्या काळाची गरज आहे.

श्री. वामन देशपाण्डे यांनी काळाची ही गरज ओळखून मुलांनाही समजेलच, परंतु प्रौढांनाही वाचनीय होईल अशा रसाळ आणि सोप्या भाषेत श्रीकृष्णचरित्र लिहिलेले आहे. आजवर मला श्री. देशपां[illegible] माहीत होते ते एक रसिक वाङ्मयप्रेमी म्हणून; परंतु या पुस्तका[illegible] द्वारे त्यांनी प्रत्यक्ष लेखनाला सुरुवात केली आहे. कृष्णचरित्रा[illegible] गाढ प्रेम, श्रद्धा आणि आदर ही त्यांची भूमिका असली [illegible] विषयाला पूर्ण न्याय देण्यासाठी त्यांनी व्यासंगही कमी केलेला

अशा या अनेकांगी अनेकरंगी श्रीकृष्णचरित्रांतूनही कुठली एकच एक गोष्ट सातत्याने जाणवते, तर ती म्हणजे निरासक्तीची शिकवण. कृष्ण निरनिराळ्या रूपांतून जाताना दिसतो, पण कुठेही स्थायिक होत नाही. अडकून पडत नाही. गोकुळात असताना गोपसख्यांवर प्राणापलीकडे प्रेम करणारा कृष्ण मथुरेला गेल्यानंतर पुन्हा कधीही मागे वळून पाहात नाही. पांडवांना राज्य मिळवून देण्यासाठी हिरिरीने झटणारा कृष्ण स्वत: मथुरेचे राजेपण अंगावरल्या वस्त्रासारखे लीलया झटकून टाकतो. निराशक्तीचे हे जीवनरहस्य तो भगवद्गीतेत उघड करतो, आणि अखेरीस सारे जग बाजूला ठेवून अरण्यांत एकाकीपणे देह ठेवतो. कृष्ण हे महान तत्त्व खरे, परंतु त्याची शिकवण ही तुमच्या आमच्यासारख्या सर्वसामान्यांसाठीच आहे. सुखदु:खांनी आपण इतके आतूनबाहेरून लडबडून गेलेले असतो, की माणुसकीचे मूलतत्त्व दिसेनासेच होते. थोडीशी चलबिचल होताच मनाचा तोल जातो, आणि व्यवहाराच्या चिखलात माणूस अधिकच खोल रुततो. म्हणूनच श्रीकृष्णाची शिकवण ‘सुखदु:खे समीकृत्वा’ राहण्याची. व्यवहार सोडून नव्हे—कारण तुम्हाआम्हांला व्यवहार सुटलेला नाहीच, पण स्वत: श्रीकृष्णही व्यवहारपटू होता. त्याने गोकुळाला आर्थिक स्थैर्य दिले. यादवांचे राज्य वसवले, कौरवांशी राजकारणात दोन हात केले, आणि युद्धनीतीचे किचकट डावपेचही तो खेळला. पण हे सारे आपले मानूनही आपण स्वत: त्यांतून दशांगुळे बाकी उरणे त्याला साधले; तुम्हाआम्हांला हाच योग साधायला कृष्णचरित्र सांगते. सुखदु:खाच्या रंगाची होळी जरूर खेळायला हवी; पण आतला माणूस उरायला हवा तो स्वच्छ, निर्मळ, रंगहीन, पाण्यासारखा, प्रकाशासारखा.

कृष्णचरित्राचे हे तत्त्व आज जगाला उमजले तर क्षुद्र स्वार्थाच्या जबड्यात अडकलेला माणूस सहजपणे मुक्त होईल. जुन्या पिढ्यांच्या आचरणात ही तत्त्वे सहजपणे येत, कारण स्वार्थ साधण्याची धडपड

तेव्हा आत्ताच्याइतकी नसावी. आज लौकिक स्वार्थ आणि संपन्नता साधता साधता आपण स्वतःला हरवत चाललो आहोत का? इतर संपन्न राष्ट्रांकडे पाहिले तरी भविष्यातला हा धोका सहज दिसून येतो. पराकोटीच्या आर्थिक संपन्नतेपायी आजच्या अमेरिकन तरुण पिढीला वैफल्याची भीषण पोकळी जाणवायला लागली आहे, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही पोकळी बुजवण्यासाठी या तरुणांना पुन्हा कृष्ण-नामाचाच जप करावासा वाटू लागला आहे. कृष्णमंदिरे बांधावीशी वाटू लागली आहेत. आजही हे चिरंतन तत्त्व ही वैफल्याची पोकळी भरून काढू लागले आहे.

तेव्हा आज आवश्यकता आहे ती श्रीकृष्णाचा संदेश सर्वसामान्य माणसापर्यंत पोचण्याची, विशेषतः तरुण वाचकवर्गापर्यंत पोचून त्यांना विचारप्रवण करण्याची. इंग्रजी माध्यमामुळे ज्या मुलांना भारतीय संस्कृतीची माहिती कमी आहे अशांसाठी आणि एकंदरीतच मुलांच्या समजुतीत भर टाकण्यासाठी आज 'श्रीकृष्णचरित्र' सारखी पुस्तके त्यांच्या हातात देण्याची गरज फार मोठी आहे. नुसते श्रीकृष्णचरित्रच नव्हे, तर रामायण, महाभारतही. ज्या ज्या ग्रंथांनी आपली संस्कृती घडवली आहे, त्या त्या ग्रंथांच्या शिकवणीचा वारसा सुबोध पुस्तका-द्वारा मुलांपर्यंत पोचणे ही आजच्या काळाची गरज आहे.

श्री. वामन देशपाण्डे यांनी काळाची ही गरज ओळखून मुलांनाही समजेलच, परंतु प्रौढांनाही वाचनीय होईल अशा रसाळ आणि सोप्या भाषेत श्रीकृष्णचरित्र लिहिलेले आहे. आजवर मला श्री. देशपांडे माहीत होते ते एक रसिक वाङ्मयप्रेमी म्हणून; परंतु या पुस्तकाच्या द्वारे त्यांनी प्रत्यक्ष लेखनाला सुरुवात केली आहे. कृष्णचरित्राविषयी गाढ प्रेम, श्रद्धा आणि आदर ही त्यांची भूमिका असली तरी या विषयाला पूर्ण न्याय देण्यासाठी त्यांनी व्यासंगही कमी केलेला नाही.

काव्यमय नाट्यपूर्ण अशा शैलीत त्यांनी कृष्ण चरित्रातले प्रमुख प्रसं[illegible]
वाचकापर्यंत अचूक पोचवले आहेत. अफाट कृष्णचरित्[illegible]
संकलन करून ते थोडक्यात पण त्रोटक वाटणार[illegible]
प्रसंगांचे सांधे व्यवस्थित जुळवून, आ[illegible]
अवघड गोष्ट होती. ती त्यां[illegible]
कृष्ण चरित्रातले चार अ[illegible]
लावता वाचकां[illegible]

[illegible] हिती
[illegible]रच्यां आणखी

—रत्नाकर मतकरी

♣

वसुदेव सुतम् देवम् [illegible]सचाणूर मर्दनम् ।
देवकी परमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ॥

कृष्ण

# —पा जन्मासी आला : १ :

पसरला होता. श्रावणातल्या सरी

आकाशात विजांचे तांडवनृत्य

…ाहात होते, ढगांचा

गड… …शी भिजून चिंब

होऊन घरांच्य… …ने … …ने पंख

झाडत होते. काजळ…

पसरलेले होते. गोठ्यातल्या गा…

मागचे पाय उडवत गळ्यातल्या घुंगरांश…

नि बंदीवासातल्या गजाआड एक तेजःपुंज माणूस

चिंतेत व्यग्र होता. फेऱ्या मारता मारता पटकन थांबत होता. गजाला धरून भविष्य पारखत होता. कोपऱ्यात त्याची पत्नी कोसळणाऱ्या सरींकडे नजर लावून बसली होती.

ब्रह्मदेवाने ज्योतिषाच्या रूपाने येऊन सांगितलेले स्वर तिला आठवू लागले—"देवकी, तुझा आठवा पुत्र जगन्-नायक असेल. त्याला तू प्रार्थना कर की, 'सर्वेश्वरा!' बालक रूपाने उदरी ये."

वसुदेव अन् देवकी. कंसाच्या रूपाने असुरांच्या साम्राज्याने त्यांना वेढले होते. गजाआड ती दोघे, सर्वेश्वराचे स्वागत करण्यासाठी आसुसलेली होती. अगोदरच्या सहा

मुलांनी तिच्या भवती फेर धरलेला होता. देवकीमातेचे हृदय भरून आले. हुरहुर वाटू लागली. देवडीवरच्या पहारेकऱ्याने बाराचे ठोके दिले.


अन्...अन् दिशा एकदम प्रकाशल्या.. प्रकाशाचा एक झोत सभोवतालचा काळाकुट्ट अंधार कापत गेला. थेट आकाशाला जाऊन भिडला. साक्षात शंखचक्रधारी जगन्-नायक वसुदेव-देवकीपुढे येऊन उभा ठाकला. हातात गदा नि पद्म धारण केलेले ते देवाचे प्रसन्न रूप पाहून वसुदेव-देवकीचे डोळे आनंदाने पाझरू लागले. वसुदेवाने प्रेमभराने नमस्कार केला, नि म्हणाले,—जगन्नायका! धरणीमातेने गाईच्या रूपाने येऊन तुला सर्व प्राणिमात्रांचे रक्षण करण्याची विनंती केली होती; हे मला पूर्णपणे ठाऊक आहे. ह्या वसुदेवाला देवपित्याचा मान दिलास, मी धन्य झालो. सर्वेश्वरा, तू बालकरूपाने देवकीच्या उदरी ये अन् ह्या धरती-मातेला तूच तार."

नि काय आश्चर्य! लाल लाल बालमुठी घट्ट धरलेले, गोरे-गोरे पान, बालक खदखदून हसू लागले. बालकरूपाने साक्षात श्रीविष्णूचा अवतार देवकीच्या पोटी अवतरला होता! देवकी आनंदून गेली. वसुदेव हर्षभरित झाला. श्रीकृष्णाचा जन्म झाला. श्रावणातली अष्टमी आनंदली. वरुणराजाच्या आनंदाला भरती आली. दाही दिशांनी, चहुअंगाने तो कोसळू लागला. वसुदेवांच्या डोळ्याला भरते आले. ते खाली वाकले. इवल्याशा बालमुखाचे चुंबन

घेतले. देवाचा मुका घेतलेला पहिला मानव. आनंदाच्या सरीला थोपवत देवकी म्हणाली—

"माझ्या ह्या सानुल्याला नंदराजाकडे घेऊन जा. कंसाची वाईट दृष्टी वळण्यापूर्वीच माझं हे विश्वरूप नंदाकडे सुखरूप पोहचवावं. बंदीवासातून 'मुक्त' व्हावं"...अन् तिने दुःखाला वाट मोकळी करून दिली. आजपर्यंत तिची सहाही मुलं दुष्ट कंसाने शिळेला वाहिली होती. आठवून आठवून तिच्या अंगाचा थरकाप उडाला. दुधावरल्या दाट साईसारखे सुरकुतलेले दुःख ह्या देवत्वाने संपुष्टात आणलेले होते.

उजाडण्यापूर्वीच वसुदेवाला नंदाघरी जाणे भाग होते. मुसळधार सरी, गार वारा नि यमुनेचा पूर, सगळ्यांना



मुलांनी तिच्या भवती फेर धरलेला होता. देवकीमातेचे हृदय भरून आले. हुरहुर वाटू लागली. देवडीवरच्या पहारेकऱ्याने बाराचे ठोके दिले.

अन्...अन् दिशा एकदम प्रकाशल्या.. प्रकाशाचा एक झोत सभोवतालचा काळाकुट्ट अंधार कापत गेला. थेट आकाशाला जाऊन भिडला. साक्षात शंखचक्रधारी जगन्नायक वसुदेव-देवकीपुढे येऊन उभा ठाकला. हातात गदा नि पद्म धारण केलेले ते देवाचे प्रसन्न रूप पाहून वसुदेव-देवकीचे डोळे आनंदाने पाझरू लागले. वसुदेवाने प्रेमभराने नमस्कार केला, नि म्हणाले,—जगन्नायका! धरणीमातेने गाईच्या रूपाने येऊन तुला सर्व प्राणिमात्रांचे रक्षण करण्याची विनंती केली होती; हे मला पूर्णपणे ठाऊक आहे. ह्या वसुदेवाला देवपित्याचा मान दिलास, मी धन्य झालो. सर्वेश्वरा, तू बालकरूपाने देवकीच्या उदरी ये अन् ह्या धरतीमातेला तूच तार."

नि काय आश्चर्य! लाल लाल बालमुठी घट्ट धरलेले, गोरे-गोरे रूपान, बालक खदखदून हसू लागले. बालकरूपाने साक्षात श्रीविष्णूचा अवतार देवकीच्या पोटी अवतरला होता! देवकी आनंदून गेली. वसुदेव हर्षभरित झाला. श्रीकृष्णाचा जन्म झाला. श्रावणातली अष्टमी आनंदली. वरूणराजाच्या आनंदाला भरती आली. दाही दिशांनी, चहुअंगाने तो कोसळू लागला. वसुदेवांच्या डोळ्याला भरते आले. ते खाली वाकले. इवल्याशा बालमुखाचे चुंबन

बाजूस सारत हा पोटचा गोळा पहाऱ्यावरच्या पहारेकऱ्यांना चुकवत नंदाघरी निघाला होता.

अवध्य कृष्ण आपल्या बालमुठी चाखत देवकीमातेच्या तृप्त चेहऱ्याकडे निरखून पाहात होता. जणू त्या जगन्नायकाने जन्मापासूनच बाललीलांना सुरवात केली. आपल्या आईला तो डोळे भरून पाहात होता. तिची माया साठवत होता. आनंदाने त्याच्याभवती फेर धरलेला असताना, वसुदेवांनी निघायची तयारी केली. श्रीकृष्णाला, त्या बालकरूप धारण केलेल्या परमेश्वराला, टोपलीत ठेवले. देवकी वाकली. आईचे हृदय स्रवू लागले. तिच्या डोळ्यांत यमुना दाटून आली. डोळे भरून आपल्या छोट्या युवराजाला तिने पाहून घेतले. परमेश्वराला साकडे घातले; अक्षय आशीर्वाद दिला. वंशवृद्धीचा....जगाच्या कल्याणाचा.

बंदीवास सरला. वसुदेव कृष्णाला घेऊन निघाला. मुसळधार पावसाने तो वंशदीपक आनंदला. वाऱ्याने फेर धरला. वाटेत यमुना, पाण्याचा पूर घेऊन आडवी आली. फेसाळून निघाली होती. पाणी वाढत होते. वसुदेव थेट, बेधडकपणे यमुनेत शिरले. जणू निर्भयतेने, वाटेतल्या अडसरांना कापत निघाले होते. पाणी नाकापर्यंत आले अन् चमत्कार घडला. बालकृष्णाच्या चिमुकल्या लालभडक पायांच्या बोटांनी यमुनेचे चुंबन घेतले. यमुना दुभंगली. वसुदेवाचा मार्ग मोकळा झाला. श्रीविष्णूच्या शेषशाईने आपला फणा, श्रीकृष्णावर धरला होता. यमुना धन्य झाली. पहाटेची चाहूल लागली.

दूरातून पावरीचे सूर झरू लागले; नि नंदाच्या घरात देवाच्या पावलाने, भाग्याने प्रवेश केला. यशोदेच्या कुशीत वसुदेवांनी बालकृष्णाला ठेवले अन् तिच्यापुढच्या नवजात अर्भकाला उचलून आपल्या टोपलीत ठेवले. मूर्च्छित यशोदेला काय ठाऊक की, आपल्या कुशीत शेषशाई विष्णू बालकरूपाने पहुडला आहे.

यशोदेची नवजात बालिका साक्षात योगमायाच होती. तिला घेऊन भल्या पहाटे वसुदेव देवकीपाशी आला. देवकीचे डोळे जणू वसुदेवाला मुक्तपणे विचारीत होते—

" माझे बाळ सुखरूप पोहोचले ना ? "

वसुदेवाने त्या योगमायेला देवकीच्या कुशीत झोपवले नि कृतकृत्य मनाने तो तुरुंगातल्या एका पायरीवर बसला; देवाची स्मृती चाळवत...

सकाळीच कंसाला देवकी प्रसूत झाल्याचे कळले. मदोन्मत तो ! आपल्या शत्रूला मारण्यासाठी रेड्यासारखा मुसंडी मारत धावत आला. त्याच्या तोंडातून फेस रूपाने द्वेष फेसाळत होता—

" देवकी तुझे अपत्य दे..."

देवकी रडवेली झाली. रडत रडत ती कंसाला विनवू लागली—

" कंसा, माझी सहा मुलं तू शिळेला अर्पण केलीस. हे माझं सातवं अपत्य. ते तरी मला परत कर. माझा आठवा पुत्र तुझा शत्रू आहे ना, पण ही तर मुलगी आहे. "

नेहमीप्रमाणे कंसाने तिच्या विनवणीकडे लक्ष न देता, त्या बालिकेला देवकीच्या हातातून हिसकून घेतली. तेव्हा मात्र देवकी संतापली आणि त्वेषाने म्हणाली--

" अरे चांडाळा, कशी फेडशील ही पापं ! "

देवकीचा आक्रोश गगनभेदी होता. कंसाने त्या बालिकेला वर उचलले, गरगरा फिरवलं नि तो तिला शिलार्पण करणार, तो एक चमत्कार घडला. बालिका त्या यमाच्या हातातून निसटली नि वेगाने आकाशात गेली. अन् तिने आकाशवाणी केली—

" कंसा ! तुझा शत्रू गोकुळात नांदतो आहे... "

## गोकुळ आनंदले : २ :

नंदाला पुत्र झाला. यशोदेला आनंद झाला. गोजिरवाणं, लालमुठीचं ते बाळ, सर्वांच्या कौतुकाचा विषय झाले. अवघे गोकुळ आनंदाने वेडे झाले. गोपगोपींची रीघ लागली. तो बालस्वरूप ईश्वर हसून सर्वांचे स्वागत करू लागला.

मोठे मोठे ज्योतिषी आले. पुण्यहवन झाले. त्यावेळी नंद-यशोदा नि छोटासा अंगठा तोंडात घातलेला युवराज, नंदाच्या मांडीवर खेळत होता. विधिपूर्वक नामकरण झाले. श्रीकृष्ण. ब्राह्मणांनी आशीर्वाद दिले. नंतर नंदराजाने, स्वतःच्या हाताने मध भरवला. सर्व ब्राह्मणांना गोदान–

संपत्तिदान केले. सगळेजण संतुष्ट झाले. सर्वांनी श्रीकृष्णाचा जयजयकार केला.

अवघे गोकुळ पताकांनी सुशोभित झाले. चंदनमिश्रित पाण्याने रस्ते धुतले. उत्तमोत्तम कपडे करून सानथोर ह्या आनंदमय वातावरणांत न्हावून निघाले. आनंदनृत्याचे बोल उठले. गुराखी आपल्या वेणूमधून स्वर्गीय संगीत गाऊ लागले. यमुनेच्या तिरावर बालगोपाळ जमू लागले. आनंदनृत्याने गरबा धरला.

दिसामासांनी श्रीकृष्ण वाढू लागला. रांगू लागला. यशोदेचा सगळा वेळ त्याला न्हाऊ-माखू घालण्यात जाऊ लागला. तो जगच्चालकसुद्धा हे सर्व कौतुक आनंदाने करवून घेऊ लागला. त्याच्या डोळ्यांत काजळ घालताना श्रीकृष्ण खोटे-खोटे रडू लागला. केस विंचरताना पुनःपुन्हा विसकटू लागला. हात-पाय आपटून तो बालस्वरूप ईश्वर यशोदामातेची त्रेधातिरपीट उडवू लागला. जेवताना तर दहीभात अंगावर उडवू लागला. सगळे दही तो यशोदामातेवर उडवू लागला. गळ्यातली सोन्याची साखळी ओढून ओढून तर श्रीकृष्णाच्या मानेवर व्रणांची रेषा पडू लागली नि हे साग्रसंगीत जेवण जेव्हा काऊचिऊच्या गोष्टीत व्हायला लागायचे तेव्हा हा लबाड हळूच निद्राधीन व्हायचा. मग यशोदामाता त्याला पाळण्यात ठेवी; झोके काढू लागे तेव्हा एखाद्या क्षणाला तो हरी हसू लागायचा. त्याच्या गोड हसण्यात यशोदेचे हसणे विरघळून जायचे. त्याच्या बोबड्या बोबड्या शब्दांना तिचे बोबडे

बोल साद द्यायचे नि हा पाळण्यातला खेळ खेळता खेळता तो खट्याळ बाळकृष्ण गाढ झोपी जायचा. दिवसभराचे मुक्त हास्य पुनः फुलण्यासाठी, काही क्षण विश्रांती घ्यायचा.

त्या द्वाड मुकुंदाला पाहाण्यासाठी काहीना काही निमित्त काढून उभ्या गोकुळातल्या गोपी, ते गोजीरवाणं रूप पुनः पुन्हा पाहाण्यासाठी येत. हृदयात साठवत. दहीदूध त्याच्याभवती उपडे करत. त्या श्यामसुंदरला पाहून त्या हात जोडत. प्रेमभराने गौळणींचा 'ईश्वर' देव झाला होता...

## पुतना-वध : २ :

गोकुळात वाढत असलेला आनंद कंसाच्या कानावर गेला. द्वाड श्यामसुंदराच्या रसभरित गोष्टी ऐकून कंस व्याकुळ झाला. छोट्या मुकुंदाला लहानपणीच ह्या जगातून नाहीसे करावे म्हणून त्याची चक्रे फिरू लागली नि त्याला अचानक-पणे पुतना नावाच्या राक्षसणीची आठवण झाली. ती कृष्णाचा वध करायला योग्य आहे असा त्याचा समज झाला. त्याने पुतनेला तावडतोब बोलावले; नि सुंदर युवतीचा, देवांगनेचा वेष घेऊन गोकुळात जायला सांगितले.

"त्याला पदराखाली घे. स्तनपान करायला लाव म्हणजे पोटात दुधाबरोबर विष जाईल. विष कृष्णाच्या पोटात भिनलं म्हणजे माझा शत्रू नष्ट होईल. ते काम करूनच मला तुझे तोंड दाखव."

कंसाकडून मिळालेले हे काम म्हणजे आपले महद्भाग्य असे समजून पुतना देवांगनेचे रूप घेते. नटते थटते. जणू स्वर्गातली साक्षात अप्सरा. त्या श्यामसुंदराला मारण्यासाठी, त्या अवध्य बाळकृष्णाला वधण्यासाठी, पुतना गोकुळात आली, तिन्हीसांजेला. तिला काय ठावे की ह्या तिन्हीसांजेला आपलाच वध होणार आहे.

त्या सुंदर 'मावशीला' पाहून यशोदा आश्चर्यचकित झाली. दारात पुतना–नव्हे देवांगना उभी होती. कृष्णाची मावशी आहे असे म्हणत तिने थेट घरात प्रवेश केला. अगदी बाळकृष्ण झोपला होता तिथे गेली. यशोदा आणि गोपी



अगदी मूक झाल्या. त्यांच्या तोंडून एक शब्दही बाहेर पडला नाही. दिङ्मूढ होऊन त्या सगळ्या पुतनेकडे पाहात होत्या. जणू त्या बालमुकुंदाने आपल्या मातेला मूक केले होते. यशोदेने तिला अडविले तर पुतनेचा वध तरी कसा करायचा. जगन्नायकाची बुद्धी स्तिमित करणारी होती.

पुतना जवळ आली. बाळकृष्ण पाळण्याच्या गजांना धरत कुशीवर पडला. एक बोट तोंडात ठेवून तो पुतनेची वाट पाहात होता. तिला पाहून त्या बालहरीला उचकी लागली. पुतनेने त्याला पाळण्याबाहेर काढले. जवळ कुशीत घेतले. जणू तिच्या ‘आनंदाला’ भरते आले. तिचा ‘पान्हा’ स्रवू लागला. लगोलग तिने कृष्णाला पदराखाली घेतले. आपले स्तन त्याच्या तोंडात बळेच घातले.

नि काय तो चमत्कार! श्रीकृष्ण तिच्या स्तनातले विष चोखू लागला. आपल्या रिकाम्या हातांनी तिच्या गळ्यातले दागदागिने ओढू लागला. थोडा वेळ गेला. ते विष चोखता चोखता, पुतनेचे प्राण कंठाशी आले.

ती ओरडू लागली– “कृष्णा! सोड, सोड.” किंचाळू लागली. तो हा हरी तिला जास्तच झोंबू लागला. स्तनातले ते विषकुंभ त्या बालहरीने रिते केले. सगळे विष त्याच्या शरीरात भिनू लागले; नि इथे अचेतन अवस्थेत पुतना खाली पडली. तिचा प्राण देह सोडून गेला. ते दृश्य पाहून यशोदेला तर ग्लानीच आली. ह्या बालस्वरूप हरीरूपाला पाहून ती

दिङ्मूढ झाली. ते बाळरूप यशोदेमातेकडे पाहून हसू लागले. यशोदेने धावत जाऊन हरीला उचलून घेतले.

पुतनेचा वध झाला. कंसाचा गोकुळातला पहिला पराभव.

## वृक्ष उन्मळले :४:

दिवसेंदिवस श्रीकृष्ण मोठा होऊ लागला. त्याचा बालहट्ट पुरा करता करता यशोदामाता त्रस्त होऊ लागली. सर्व गोकुळाचा एकच विषय, एकच कौतुक–श्रीकृष्ण. तो आता पावले टाकू लागला होता. इकडून तिकडे धावू लागला होता. मध्येच धावताना पडायचा, नि त्याच्या कुंदकळ्या पसरायच्या. गळ्यातली सोन्याची माळ नि कमरेतला सोन्याचा करगोटा सांभाळत, जेव्हा इकडे-तिकडे धावायचा तेव्हा यशोदेचे समाधान व्हायचे.

एकदा काय झालं, यशोदा ताक घुसळत होती. कामात दंग असताना तिचे मन कृष्णाभवतीच घुटमळायचं. कृष्ण-विचारात दंग असताना तो हरी रांगत रांगत आला. तिच्या पायाला धरून उभा राहिला नि खुदकन हंसला. यशोदा-माता आनंदली. तो तिच्या कानाशी आपल्या बोबड्या भाषेत कुजबुजला. तिला कळलं, ह्या लबाडाला काय पाहिजे ते. यशोदा म्हणाली, लबाड कृष्णा, थांब हो जरा, एवढे हे लोणी काढते नि मग तुला पदराखाली घेते.'

माझा राजा तो. असं म्हणत यशोदा पुनः ताक घुसळायला लागली. श्रीकृष्णाचा अपमान झाला. तो हातपाय आपटू लागला नि केवढा मोठा गळा काढला. जोरजोराने रडू लागला. स्वारीचा अपमानच तो. यशोदा कधी नव्हे ती चिडली. चिडून म्हणाली— " कृष्णा, तुझा हट्ट भारीच वाढलाय हो. थांब तुला दाखवते माझा राग. "

तेवढ्यात तो मुकुंदा रागारागाने निघून गेला. स्वारी कुठे गेली कुणास ठाऊक; पण येताना त्याने एक काठी आणली नि हाणलीन यशोदा ताक घुसळत असलेल्या मातीच्या रांजणावर. रांजण फुटला. कृष्णाचा राग काठीच्या रूपाने रांजणावर सोडला. आतलं ताक जमिनीवर पसरलं नि त्यातलं लोणी त्या ताकावर कागदाच्या होड्यांसारखं तरंगू लागलं.

यशोदेचा राग अनावर झाला. कृष्णाच्या खोड्या वाढल्या होत्या–" थांब हो आता; माझं ताक सांडलंस, रांजण फोडलास, तुला आता उखळीला बांधते म्हणजे एका ठिकाणी तरी राहाशील. " असं म्हणत यशोदेनं त्याला बळेच एका भल्या मोठ्या उखळीला बांधला नि ती कामाला लागली...

बाळकृष्ण त्या उखळीसमवेत रांगत रांगत बाहेर पडला. अंगणात गेला. ह्या बालक रूपातल्या जगन्नायकाने ती भली थोरली उखळ वाहून नेली. अगदी सहजतेने. अंगणात दोन वृक्ष आपला प्रचंड देह सांभाळत जवळजवळ उभे होते. त्यांचे नाव होते ' अर्जुन-वृक्ष '. बाळकृष्ण तिथे पोहोचला.

त्याची उखळ त्या दोन प्रचंड-वृक्षांत अडकली. उखळ पुढे हलेचना नि त्यामुळे मुकुंदाचे रांगणे खुंटले.

मग करतो काय. जोर लावला. पण अडकलेली उखळ जागची हलेचना. मग बालमुकुंदाची सर्व शक्ती पणाला लागली नि क्षणात भलतेच घडले. कानठळ्या बसतील एवढा मोठा आवाज झाला. जणू ढगांचं आकाशातलं द्वंद्व सुरू झालं नि ते जुळ्या भावासारखे प्रचंड अर्जुन–वृक्ष मुळापासून उपटून धरणीवर कोसळले. ते पाहून हा माधव उखळीसहीत धावत धावत लांब पळाला.

यशोदामाता बाहेर आली. दारातले वृक्ष उन्मळलेले पाहून



माझा राजा तो. असं म्हणत यशोदा पुनः ताक घुसळायला लागली. श्रीकृष्णाचा अपमान झाला. तो हातपाय आपटू लागला नि केवढा मोठा गळा काढला. जोरजोराने रडू लागला. स्वारीचा अपमानच तो. यशोदा कधी नव्हे ती चिडली. चिडून म्हणाली— " कृष्णा, तुझा हट्ट भारीच वाढलाय हो. थांब तुला दाखवते माझा राग. "

तेवढ्यात तो मुकुंदा रागारागाने निघून गेला. स्वारी कुठे गेली कुणास ठाऊक; पण येताना त्याने एक काठी आणली नि हाणलीन यशोदा ताक घुसळत असलेल्या मातीच्या रांजणावर. रांजण फुटला. कृष्णाचा राग काठीच्या रूपाने रांजणावर सोडला. आतलं ताक जमिनीवर पसरलं नि त्यातलं लोणी त्या ताकावर कागदाच्या होड्यांसारखं तरंगू लागलं.

यशोदेचा राग अनावर झाला. कृष्णाच्या खोड्या वाढल्या होत्या–" थांब हो आता; माझं ताक सांडलंस, रांजण फोडलास, तुला आता उखळीला बांधते म्हणजे एका ठिकाणी तरी राहाशील. " असं म्हणत यशोदेनं त्याला बळेच एका भल्या मोठ्या उखळीला बांधला नि ती कामाला लागली...

बाळकृष्ण त्या उखळीसमवेत रांगत रांगत बाहेर पडला. अंगणात गेला. ह्या बालक रूपातल्या जगन्नायकाने ती भली थोरली उखळ वाहून नेली. अगदी सहजतेने. अंगणात दोन वृक्ष आपला प्रचंड देह सांभाळत जवळजवळ उभे होते. त्यांचे नाव होते ' अर्जुन-वृक्ष '. बाळकृष्ण तिथे पोहोचला.

त्याची उखळ त्या दोन प्रचंड-वृक्षांत अडकली. उखळ पुढे हलेचना नि त्यामुळे मुकुंदाचे रांगणे खुंटले.

मग करतो काय. जोर लावला. पण अडकलेली उखळ जागची हलेचना. मग बालमुकुंदाची सर्व शक्ती पणाला लागली नि क्षणात भलतेच घडले. कानठळ्या बसतील एवढा मोठा आवाज झाला. जणू ढगांचं आकाशातलं द्वंद्व सुरू झालं नि ते जुळ्या भावासारखे प्रचंड अर्जुन-वृक्ष मुळापासून उपटून धरणीवर कोसळले. ते पाहून हा माधव उखळीसहीत धावत धावत लांब पळाला.

यशोदामाता बाहेर आली. दारातले वृक्ष उन्मळलेले पाहून



तिच्या मनात विचारांचे काहूर माजले. शुभ-अशुभांचे वादळ त्या माउलीच्या मनात घोंगावू लागले. बालमुकुंदाला उखळीसहित शोधण्यासाठी तिची नजर त्या वृक्षांपाशी घुटमळत राहिली. ' कुठून त्या हरीला ओरडले नि उखळीला बांधले असे यशोदामातेला वाटले. तिच्या डोळ्यांतून भीती सांडू लागली. एवढ्यात तिची नजर लांबवर गेली. लंगडा बाळकृष्ण उखळ घेऊन यशोदामातेची ती अनुकंपनीय अवस्था बघून हसत होता. त्या निर्व्याज हसण्याने यशोदामातेच्या डोळ्यांतून आनंदाश्रू ओघळू लागले. मनातल्या मनात तिने आपल्या ह्या ईश्वराला नमस्कार केला; नि धावत जाऊन उराशी कवटाळून घेतले.

उखळीतून मुक्त झालेला तो हरी यशोदेच्या कुशीत विसावला होता. आनंद नि संकट निवारण ह्यांच्या संगमात लहानगा माधव डुंबत होता. सभोवती गोपी हा मातृवात्सल्याचा सोहळा पाहात, त्या जगन्नायकाला मनोमन प्रार्थीत होत्या.

## विश्वदर्शन जाहले : ४ :

श्रीकृष्णाची ही शक्ती पाहून यशोदा स्तिमित जाहली. त्याच्यातल्या ईश्वरी अंशाबद्दल तिला आता तिळमात्र शंका नव्हती. तिला आता त्या बाळगोपाळाला पाहून आनंदाचे उधाण आले. तिचा पान्हा पुनः पुनः स्रवू लागला. तिने त्याला पदराखाली घेतले. त्याचे सोनेरी जावळ यशोदा

कुरवाळू लागली. त्याच्या काजळ घातलेल्या डोळ्यांत स्वतःचे रूप निरखू लागली.

त्याच्या खळ्यांमध्ये स्वतःचे हासू प्रेमभराने ओतू लागली, कृष्णप्रेमात बेभान झालेली यशोदा स्वतःलाच विसरून गेली. श्रीकृष्णाचे दुग्धपान चालू होते. दूध पिऊन त्या माधवाने तृप्तीची ढेकर दिली नि पदराआडून आपला मुखचंद्र बाहेर काढला. काळ्याभोर ढगांतून बाहेर पडताना पौर्णिमेचा चंद्र जितका प्रसन्न नि आल्हाददायक दिसतो तसा.

त्या श्रीकृष्णाचे रूप पाहून यशोदा आनंदली.

त्याचे मुख न्याहळताना श्रीकृष्णाने जांभई दिली नि काय आश्चर्य; भोवतालच्या विश्वाने त्याच्या मुखात प्रवेश केला. ती एका आश्चर्याची सुरुवात होती. तो सुखद एक क्षण होता, जो पुढे कोणाच्याच आयुष्यात येणार नव्हता. यशोदेने श्रीकृष्णाच्या मुखात आश्चर्याने काय पाहिले ठाऊक आहे ?

चंद्र-सूर्य, आकाशीचे चांदणे, नदी-नाले-विवरे, समुद्र-महासागर, सगळे सगळे डोकावू लागले. पर्वतराज हिमालय, उंच उंच शिखरे, खोल खोल दऱ्या, घनदाट अरण्ये, अनेक हिंस्त्र पशु-पक्षी, हरणे, ससे, अनेक वन्य प्राणी डोकावू लागले. डोळ्यांपुढून सरकू लागले.

एवढेच नव्हे तर स्वर्गसुद्धा यशोदेच्या डोळ्यांना दिसला. गंधर्व-किन्नर-यक्ष सगळे अनादीअनंत दिसले. सबंध सूर्य-मालिका श्रीकृष्णाच्या मुखात गोलाकार फिरू लागली नि

हे पाहात असताना प्रलय झाला. चहुबाजूंनी पाणीच-पाणी उसळू लागले. प्रचंड लाटा सर्व सूर्यमालिकेला ग्रासू लागल्या. यशोदेचे डोळे आनंदाने नाचू लागले. काय बघू नि काय नको असे तिला झाले. ह्या गोष्टीवर विश्वास तरी कसा ठेवायचा ? किती आठवू नि किती विसरू !

अन् एक महदाश्चर्य घडले. सगळीकडे पाणीच पाणी झाले. त्या पाण्यावर एक पिंपळ-पान तरंगू लागले. त्या पिंपळ-पानावर छोटा बाळकृष्ण आपला उजवा अंगठा तोंडात आणि डाव्या हातात आपला इवलासा उजवा पाय धरून संथपणे पहुडला होता. हलकेच तरंगत होता–संथपणे लाटांवर. ते विश्वरूप पाहून यशोदा आश्चर्यचकित झाली. श्रीहरींनी तिच्या डोळ्यांचे पारणे फेडले होते. आपल्या अस्तित्वाची जाण यशोदामातेला त्याने आणून दिली. आपल्या घरात साक्षात श्रीविष्णूचा अवतार नांदतो आहे ह्याची यशोदेला जाणीव झाली. ती माता धन्य झाली.

## बाललीलांना उधाण आले : ६ :

रोहिणीचा मुलगा बलराम श्रीकृष्णाहून मोठा. समंजस अन् काहीसा आडदांड. श्रीकृष्णावर सावलीसारखी आपली छाया धरणारा. बाळ मुकुंदाचे अन् त्याचे चांगलेच जमले. कृष्णाला तर आता अंगण अपुरे पडू लागले. शेजारच्या घरांतून आता हा हुंदडायला लागला. नाचू लागला. बागडू

लागला. बलरामाशी जास्त मस्ती करी तो लवाड. त्याच्याशी कुस्ती खेळे. गोपांच्या गोठ्यात जाई अन् वासरासारखा स्वैर नाचे. गळ्यातल्या घुंगुरासारखा गोड गोड बोले. गाईच्या पोटाखालून धीटपणे जाई. गावातल्या गुराख्यांना एकत्र करून त्यांच्याशी बोबडं बोबडं बोले. त्यांना मजेशीर गोष्टी सांगून हसवी. त्यांच्याबरोबर नाच करून दंगामस्ती करी. अशा त्याच्या बाललीला सुरू झाल्या.

तो श्रीहरी आता गौळणींकडे दूध-दही मागतो, नि त्या हरिभक्त गौळणी त्याला दह्यादुधाने माखून काढतात. दुपारच्या वेळेला आपल्या बाळगोपाळांची सेना घेऊन सरळ गौळणींच्या घरात शिरतो अन् एकमेकांवर चढून कृष्ण शिक्यावरची दह्याची मडकी फोडतो. पेंद्या नि सगळे गोपाळ दही वाटून खातात: मग दुसरे घर. रांजणात तरंगत असलेले लोणी खाऊन फस्त करीत. गौळणींना त्रास देत कृष्णलीला सुरू होतात.

गौळणींचे तांडेच्या तांडे कृष्णाची कृत्ये सांगायला यशोदेकडे येऊ लागतात. यशोदामातासुद्धा ह्या तक्रारींना कंटाळते. ती कृष्णाला रागे भरते.

"सर्व आरोप खोटे आहेत, ह्या गौळणी मजवर वृथा आरोप करतात. मी इतका छोटा मग कशीगऽकरीन चोरी ?" असे म्हणून तिला तो निरुत्तर करी.

यशोदामाता सर्व गौळणींची समजूत करून त्यांना पाठवून देई; नि चिमुकल्या माधवाला कुशीत घेऊन सर्व काही विसरून जाई.

हे पाहात असताना प्रलय झाला. चहुबाजूंनी पाणीच-पाणी उसळू लागले. प्रचंड लाटा सर्व सूर्यमालिकेला ग्रासू लागल्या. यशोदेचे डोळे आनंदाने नाचू लागले. काय बघू नि काय नको असे तिला झाले. ह्या गोष्टीवर विश्वास तरी कसा ठेवायचा ? किती आठवू नि किती विसरू !

अन् एक महदाश्चर्य घडले. सगळीकडे पाणीच पाणी झाले. त्या पाण्यावर एक पिंपळ-पान तरंगू लागले. त्या पिंपळ-पानावर छोटा बाळकृष्ण आपला उजवा अंगठा तोंडात आणि डाव्या हातात आपला इवलासा उजवा पाय धरून संथपणे पहुडला होता. हलकेच तरंगत होता–संथपणे लाटांवर. ते विश्वरूप पाहून यशोदा आश्चर्यचकित झाली. श्रीहरींनी तिच्या डोळ्यांचे पारणे फेडले होते. आपल्या अस्तित्वाची जाण यशोदामातेला त्याने आणून दिली. आपल्या घरात साक्षात श्रीविष्णूचा अवतार नांदतो आहे ह्याची यशोदेला जाणीव झाली. ती माता धन्य झाली.

## बाललीलांना उधाण आले : ६ :

रोहिणीचा मुलगा बलराम श्रीकृष्णाहून मोठा. समंजस अन् काहीसा आडदांड. श्रीकृष्णावर सावलीसारखी आपली छाया धरणारा. बाळ मुकुंदाचे अन् त्याचे चांगलेच जमले. कृष्णाला तर आता अंगण अपुरे पडू लागले. शेजारच्या घरांतून आता हा हुंदडायला लागला. नाचू लागला. बागडू

लागला. बलरामाशी जास्त मस्ती करी तो लबाड. त्याच्याशी कुस्ती खेळे. गोपांच्या गोठ्यात जाई अन् वासरासारखा स्वैर नाचे. गळ्यातल्या घुंगुरासारखा गोड गोड बोले. गाईच्या पोटाखालून धीटपणे जाई. गावातल्या गुराख्यांना एकत्र करून त्यांच्याशी बोबडं बोबडं बोले. त्यांना मजेशीर गोष्टी सांगून हसवी. त्यांच्याबरोबर नाच करून दंगामस्ती करी. अशा त्याच्या बाललीला सुरू झाल्या.

तो श्रीहरी आता गौळणींकडे दूध-दही मागतो, नि त्या हरिभक्त गौळणी त्याला दह्यादुधाने माखून काढतात. दुपारच्या वेळेला आपल्या बाळगोपाळांची सेना घेऊन सरळ गौळणींच्या घरात शिरतो अन् एकमेकांवर चढून कृष्ण शिंक्यावरची दह्याची मडकी फोडतो. पेंद्या नि सगळे गोपाळ दही वाटून खातात; मग दुसरे घर. रांजणात तरंगत असलेले लोणी खाऊन फस्त करीत. गौळणींना त्रास देत कृष्णलीला सुरू होतात.

गौळणींचे तांडेच्या तांडे कृष्णाची कृत्ये सांगायला यशोदेकडे येऊ लागतात. यशोदामातासुद्धा ह्या तक्रारींना कंटाळते. ती कृष्णाला रागे भरते.

"सर्व आरोप खोटे आहेत, ह्या गौळणी मजवर वृथा आरोप करतात. मी इतका छोटा मग कशीगऽकरीन चोरी?" असे म्हणून तिला तो निरुत्तर करी.

यशोदामाता सर्व गौळणींची समजूत करून त्यांना पाठवून देई; नि चिमुकल्या माधवाला कुशीत घेऊन सर्व काही विसरून जाई.

## वृंदावन : ७ :

गोकुळचा मुकुंदा चंद्राच्या कोरीसारखा दिसामासानी वाढू लागला. त्याच्या खोड्यांना तर आता मस्ती चढली होती. गोकुळचा आनंद आनंदाने वाढत होता.

एके दिवशी गोकुळातले काही वृद्ध गोप नंदाकडे आले. नंदाने त्यांचे यथोचित स्वागत केले. त्यांना बसायला आसन दिले; नि त्यांचे कुशल विचारले. तेव्हा गोप नंदाला म्हणाले--

"राजा, तुझ्या राज्यात आम्हांला काही कमी नाही. आम्हांला राजाच्या रूपाने एक वत्सल पिता मिळाला आहे. श्रीकृष्णाच्या रूपाने तर स्वर्गीचा आनंद या भुवनावर उतरला आहे. आम्हांला काय कमी आहे! पण राजा, एक गोष्ट तुझ्या कानावर घालू इच्छितो.

"गोकुळातले अन्नधान्य संपत आले आहे. गोमातांना चरायला कुरण नाही. गवत संपले आहे. त्यामुळे घरची लेकरे दुधासाठी रडू लागली आहेत. ह्या गोकुळातले सुख कमी होऊ लागले आहे. कृष्णाकडे, त्याच्या बाललीलांकडे पाहून आम्ही आपले हसू लपवू शकत नाही.

"पण कृष्णाचा आनंद टिकावा म्हणून आपण हे गाव सोडूया. जवळच गोवर्धन पर्वत आहे. त्याच्या जवळून कालिंदी नदी वाहते. भोवती अरण्य आहे. आपल्या गोमातांना तेथे भरपूर चरायला मिळेल. गावकऱ्यांना शेती करायला

जमीन मिळेल. नवे गाव वसवू. तू तेथे चल. तू आमचा राजा, आम्ही तुझी प्रजा, आनंदाने राहू."

"राजा, आज आकाशाशी स्पर्धा करणारे दोन वृक्ष पडले. काल पुतना-चेटकीण येऊन गेली, नि उद्या आणखी काही घडेल. ही भूमी कृष्णाला त्रास पाहातेय. आम्हाला तिची भीती वाटते. तो परमेश्वर सर्व निवारण करतो आहे, पण आपण दैवाला कां बरं आव्हान करावं? ह्या अशुभ घटनांचा मागोवा घेताना आम्हाला तरी असं वाटतं की आपण त्वरित गोवर्धन पर्वताच्या आजूबाजूला जे पटांगण आहे तिथे जाऊ. नवे गाव वसवू."

गोपांच्या ह्या विनवणीला नंदाने विचारपूर्वक होकार दिला. कोपऱ्यात छोटासा बाळकृष्ण ऐकत होता सारे. तो खुदकन् हसला. त्याची जणू ती संमती होती....

वर्षा ऋतूतल्या मेघमालिकांचा तांडा निघावा तसा गोपांच्या खिल्लारांचा तांडा निघाला. गाई-गुरे पुढे होती. सर्व गोप-गोपी पाठीवर सामान घेऊन आनंदाने गाणी म्हणत, पक्ष्यांना हाकारत गाण्याच्या मंजुळ स्वरात नाचत-बागडत निघाली.

एका रथात नंद बसला होता. शेजारी गोपाळकृष्ण सजला होता नि सूर्यफुलाने जसे नेहमी सूर्यबिंबाकडे आपली मान फिरवावी तशी सर्व गोपींची मान कृष्णाकडे सारखी सारखी वळत होती. त्यांचा हृदयस्वामी नंदरथात आनंदाने टाळ्या पिटत होता, संसारापेक्षा कृष्णात आपलं मन ओतणाऱ्या ह्या गोपी कृष्णाला प्राणाहून प्रिय मानीत होत्या.

छोटे छोटे गुराखी पावा वाजवत होते. जवळील वाद्ये घुमवत होते. आनंदाने, उधाण वाऱ्यासारखे वेगाने उचंबळत होते. गोवर्धन पर्वताकडे जाणारा वृक्षराजीतला मार्ग बहरून निघाला होता. झाडावरचे पक्षीही आनंद-यात्रा पाहात होते. मध्येच शीळ मारत होते नि यात्रा पुढे गेली की त्यांना साथ करत आपली घरटी सोडत होते. राघु-मैना-साळुंखी-चिमण्या--अनेक असंख्य पक्षी साथ देत होते. कितीतरी पक्ष्यांनी नंद-रथाभोवती फेर धरला होता नि तो युवराज आनंदून त्या पक्ष्यांना हाकारत होता.

नंदाची प्रजा नव्या युवराजाला, त्याच्याबरोबर राहायला मिळणार म्हणून आनंदली होती. बाळगोपाळांचे सैन्य, गाईंच्या गळ्यातले घुंगूर, दुरून येणारे पाव्याचे स्वर, साथीला तऱ्हेतऱ्हेची वाद्ये--पक्षांचे निरनिराळे आवाज, त्यांचा एकच गोंधळ उडाला होता. वाटेतल्या दऱ्यादऱ्यांतून त्यांचे प्रतिध्वनी उमटत होते. नद्या-नाले आपल्या पाण्यात त्यांचे प्रतिबिंब न्याहळत होते.

नि दूरवर एका झाडाखाली एक गौळण अनिमिष चेहऱ्याने, हे दृश्य आपल्या डोळ्यात साठवत होती. झालेला आनंद आपल्या शरीरात भरभरून साठवून घेत होती. तिच्या अंगांगातून वीज संचारत होती. तिच्या मानसमंदिरातला प्रियकर नंदाच्या रथातून तिला खुणावत होता. नि ती गोपिका सुखावत होती, तिचं नाव राधा ...

तो जगाला विसरली होती. कृष्णरूप झाली. हरीची मूर्ती तिच्या डोळ्यासमोर नाचायला लागली. पाव्याचे सूर घुमू लागले. देहरूपाने तिथे बसून ती मनाने कृष्णाबरोबर रथात आरुढ झाली. तिचा हरी तिच्या शेजारी बसला होता तिला वृंदावनात नेण्यासाठी.

## वनक्रीडा : ८ :

बलराम-कृष्ण-गोपगोपी सगळ्या सगळ्यांना वृंदावन म्हणजे भू-तलीचा स्वर्ग वाटू लागला. यमुनेचे काळे पात्र-मोठे थोरले वाळवंट-गच्च रान नि एखाद्या भल्यामोठ्या हत्तीसारखा गोवर्धन. अवघं वृंदावन गजबजून गेलं. कृष्णाने तर हातात स्वरांची जादू घेतलेली होती. तिचं नाव मुरली.

आता कृष्णाने यशोदेकडे नवाच हट्ट धरला होता. त्याच्या हुंदडेपणाला, त्याला मातेकडून नवी पावती हवी होती.

" आई, मी आजपासून वनात जाणार. गाईंना गवत चारणार. माझे सगळे मित्र-पेंद्या वगैरे तेथे येतील. सकाळी वनात जाईन. दुपारी तिथेच भाकरी खाईन नि संध्याकाळी परत येईन. आई ! मला परवानगी दे ना... "

यशोदामाय हबकली. कृष्णाचा नवा हट्ट त्याच्या परंपरेला साजेसाच होता. ती कृष्णाला घाबरवण्यासाठी म्हणाली,

" अरे माझ्या मुकुंदा, रानात वाघ-सिंह असतात. रानात काटे असतात. ते तुझ्या पायात जातील. मग तुझ्या पायातून रक्त येईल. तुझे मऊ-मऊ पाय रानात भटकून भटकून दुखू लागतील. मग तू रडायला लागशील. तिथे मग मी नसेन."

श्रीकृष्ण हसत हसत म्हणाला--

" आई ! तू काही काळजी करू नकोस."

कृष्णाच्या स्मिताने यशोदामाता लोण्यासारखी विरघळली.

" कृष्णा, जा माझ्या राजा ! रानात जा. गाईमागून हिंड आणि हिंडतांना भीती वाटलीच तर धावत माघारी ये."

श्रीकृष्ण आनंदाने रंगला. यशोदेने त्याच्या केसांत एक मोरपीस खोवले. पितांबर नेसवला. एक पावरी त्याच्या-जवळ दिली. कपाळावर केशरी गंध लावलं. तेव्हा श्रीकृष्ण दृष्ट लागावी तसा दिसू लागला. यशोदेने त्याला उचलून घेतले. यशोदेच्या चुंबनांचा वर्षाव त्याच्या गालावर होऊ लागला, आणि दारात उभे असलेले त्याचे सवंगडी हा माययशोदा नि तिच्या कान्ह्याचा खेळ देहभान विसरून पाहू लागले.

छोटा बाळकृष्णासारखाच नटलेला त्याचा दादा बलराम जणू राम-कृष्णाची जोडी. वनात निघाली--

" आई, येतो ! "

कृष्णाने हात वर करून आईला सांगितले. यशोदेच्या डोळ्यांत आनंदाचे अश्रू उभे राहिले.

दिवसभर कृष्ण हुंदडू लागला. गाईंना वनात सोडून सगळे सवंगडी तऱ्हेतऱ्हेचे खेळ खेळू लागले. भलेमोठे यमुनेकाठचे वाळवंट—बाजूला काळीभोर यमुना अन् एका बाजूला दाट झाडी.

सूरपारंब्या, लपालपी, नदीतले पोहणे, वस्तू लपवून एखाद्या मित्राला रडवणे—एक ना दोन, अनेक खेळांनी ह्या वाळवंटात कृष्णामुळे आनंदाचा झरा वाहू लागला. प्रत्येक गोपाळाला कृष्णसखा हवा. प्रत्येकाला बिचारा एकच कृष्ण कसा पुरा पडणार! श्रीकृष्णालासुद्धा प्रश्न पडायचा. तो हरी प्रत्येकाबरोबर खेळायचा. कुणाबरोबर लंगडी घाल. कुणाला पाण्यात बुडव. कुणाची वस्तू लपव. हरीलीलांना—कृष्णाच्या खेळांना उधाण आले.

दुपार झाली की कदंबाच्या छायेत हे सगळे छावे एकत्र यायचे. प्रत्येकाची शिदोरी कृष्णापुढे रिती व्हायची. प्रत्येकाची शिदोरी म्हणजे जादुची पोतडी. काय निघेल ते सांगता येत नसे. कुणाचा शिरा, कुणाचा लाडू, कुणाची भाकरी, कुणाचे लोणचे, एक ना दोन, हजार वस्तू. त्या किलबिलाटात दुपारची एखादी वाऱ्याची झुळूक सामील व्हायची. पक्षीसुद्धा ह्या कृष्णाचा जेवणाचा कार्यक्रम पाहण्यासाठी कदंबवृक्षावर जमा होत.

कृष्ण सगळ्यांना वाटून देत असे. मग प्रत्येक सवंगडी आपला प्रत्येक घास कृष्णाला भरवायचा. श्रीकृष्णाला भरविण्यात ह्या गोपाळांची पोटे भरायची.

मग संध्याकाळ व्हायची. कृष्ण सगळ्यांना हाकारायचा. पण कोणी येत नसे. म्हणायचे–थोडा थांब. एवढा एकच डाव पुरा करतो.

मग कृष्णाची मुरली ओठावर जायची. स्वर्गीय सूर बाहेर पडायचे. गाई असतील तेथून धावत येत. त्याच्या भोवती उभ्या राहात. झाडावरचे पक्षी आपापले पंख मिटवून बाजूला येऊन बसत. सगळे सवंगडी आपला खेळ सोडून त्याच्या-भवती जमा होत नि सूर्याचे किरण क्षणभर रेंगाळत रेंगाळत ते स्वर्गीय सूर ऐकत कदंबाच्या तरुशाखांवर हलकेच येऊन बसत. फांद्यांतून खाली येणाऱ्या त्या किरणात कृष्णाची श्यामल मूर्ती आणखी हंसायची नि मग संध्याकाळ व्हायची. तिन्हीसांजा दाटू लागत. सगळे गोपपुत्र, गाई, झाडावरचे पक्षी घरट्याकडे निघत. दिवसभर खेळून दमलेली ही मुलं गावावरच्या वेशीवर येत. कृष्ण आपल्या सवंगड्यांना सकाळचं आमंत्रण देत घराकडे परतायचा. सवंगड्यांचे पाय जड होत.

इकडे यशोदा दारात येऊन कृष्णाची वाट पाहात उभी असायची. कृष्ण धावत यायचा नि यशोदेच्या कुशीत विसावायचा. सगळा दिवसभर सहन केलेला विरह संध्याकाळी यशोदेच्या कुशीत डोळ्यातल्या आनंदाश्रूंनी न्हाऊन निघायचा.